# जाहीर ई-निविदा सूचना (दुसरी मुदतवाढ)

समतोल आहाराकरीता पालघर जिल्ह्यातील जव्हार व मोखाडा तालुक्यातील आदिवासी शिधापत्रिकाधारकांना खाद्यतेल उपलब्ध करणेकरीता ई-निविदा राबविणेत आली होती. त्यानुसार दिनांक: २९/०६/२०१९ रोजी ई-निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर ई-निविदा उघडणेचा दिनांक: ११/०७/२०१९ असा होता. परंतु सदर ई-निविदा कालावधीत प्राप्त झालेल्या ई-निविदांची माहिती ऑनलाईन पाहिली असता तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याने शासन निर्णय दिनांक: ०१/१२/२०१६ सोबतच्या नियम पुस्तीका मधील अट क्रमांक ४.४.३.१ मध्ये नमूद केलेनुसार दिनांक: १७/०७/२०१९ रोजीपर्यंत सात दिवसांकरीता पहिली मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु पहिली मुदतवाढ दिल्यानंतर देखील ई-निविदा कालावधीत प्राप्त झालेल्या ई-निविदांची माहिती ऑनलाईन पाहिली असता पुन्हा तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे निविदाकारांकडून ई-निविदा मागविणेसाठी अजून ७ दिवसांची मुदतवाढ देणेत येत आहे. ई-निविदेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

*** सदर निविदा कार्यक्रम पुढीलप्रमाणे निश्चित करता येईल-**

| | |
|---|---|
| निविदा अर्जाची किंमत | रूपये १०,०००/- (अक्षरी दहा हजार रूपये मात्र) |
| सुरक्षा अनामत रक्कम | रूपये १२,५०,०००/- (अक्षरी बारा लक्ष पन्नास हजार रूपये मात्र) |
| इसारा रक्कम | २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार रुपये मात्र) |
| निविदा प्रसिध्द करणे | दिनांक २९/०६/२०१९ रोजी सकाळी ११:००वाजता |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दिनांक: २९/०६/२०१९ रोजी सकाळी ११:०० वा. पासून दिनांक: २४/०७/२०१९ सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| निविदा अर्जाची किंमत व इसारा रक्कम ऑनलाईन भरणेचा कालावधी | दिनांक: २९/०६/२०१९ रोजी सकाळी ११:०० वा. पासून दिनांक: २४/०७/२०१९ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा अपलोड करणेचा अंतिम दिनांक | दिनांक: २४/०७/२०१९ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक: २५/०७/२०१९ रोजी सायंकाळी ४:०० वाजता |
| निविदा उघडण्याचे ठिकाण | जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर |
| संपर्कासाठी पत्ता | जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, पालघर<br>ई मेल - dsopalghar2014@gmail.com |

उक्त कामाबाबत निविदा, अटी व शर्ती, इत्यादीबाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक: २४/०७/२०१९ रोजी सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. तसेच ई-निविदा दिनांक: २५/०७/२०१९ रोजी दुपारी ४:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे उघडण्यात येईल.

**जिल्हाधिकारी पालघर करीता**